REGISTERED No. B 3434

जाहिरातींचे दर.
खालील पत्त्यावर चौकशी करावी.
व्यवस्थापक, अर्थ,
'दुर्गाधिवास' पुणें ४.

# अर्थ

वर्गणीचे दर.
वार्षिक वर्गणी
रु. ४.
( टपाल हांशिल माफ )
किरकोळ अंकास
एक आणा.

'अर्थ एव प्रधानः' इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र.

संपादक—प्रो. वा. गो. काळे.

वर्ष ६ पुणें, बुधवार, तारीख ४ सप्टेंबर, १९४० अंक ३६

चेअरमन,
व्ही. एन. पाटील, एस्क्वायर,
एम. ए. (कँटब), बार-अॅट-लॉ,
माजी एम. एल. सी.

मॅनेजिंग एजंट,
पी. आय. पाटील अँड सन्स

पंचवार्षिक बोनस
तहाहयात रु. ६० दर हजारी हयातींत रु. ५०

प्रगतीच्या पथावर असलेली
दि
ग्रेट सोशल लाईफ अँण्ड जनरल अॅशुरन्स लिमिटेड.
ब्रँच ऑफिस—लक्ष्मीरोड, पुणें. S एजन्सीकरितां आजच लिहा. S हेड ऑफिस—जळगांव, पू. खा

पूर्ण स्वदेशी
कमी प्रिमियम, जास्त नफा,
विमेदारांस अत्यल्प हप्त्यांत,
भरपूर सवलती
आधुनिक शास्त्रशुद्ध विम्याच्या उपयुक्त विविध योजना. सविस्तर माहिती मागवा.

के. जी. चौधरी,
लाईफ मॅनेजर.

के. एच. सुराणा, विमा केसरी,
जनरल मॅनेजर.

महायुद्धाची जाणीव ! कपड्यांच्या खर्चांत काटकसर करा. एक वेळ येऊन स्वतःची खात्री करा व पैशाचा मोबदला घ्या.

बंबाचे माडीवर

महिंद्रकर ब्रदर्स
तयार कपड्याचे व्यापारी

बुधवार चौक, पुणें

## विविध माहिती

**दारूभक्तांची गैरसोय दूर**

विदेशी दारू पिण्याची ज्यांस संवय आहे, त्यांस ती मिळण्याची इष्ट ती सोय करून देण्याचें मुंबई सरकारचें धोरण आहे. त्यास अनुसरून, सरकारनें मुंबईमधील आणखी कांहीं हॉटेलांस व रेस्टॉरंटांस विदेशी दारू विकण्याचे परवाने दिले आहेत, असें समजतें. दारूविक्रीचे तास मात्र कमी करण्यांत आले आहेत.

**हिंदी चहाची निर्गत**

हिंदुस्थानांतून १९३९–४० मध्यें ३६ कोटि, ३२½ लक्ष पौंड चहाची निर्गत झाली. एकूण ८,४०,६१४ एकरांत चहाची लागवड झालेली होती.

**पाचोरा–जामनेर रेल्वे कं. लि.**

वरील कंपनीनें, ३१–३–४० अखेर संपलेल्या वर्षाबाबत १½% दरानें म्हणजे प्रत्येक भागास १½ रु. प्रमाणें डिव्हिडंड जाहीर केलें आहे. डिव्हिडंडमधून प्राप्तिवरील कर वजा व्हावयाचा आहे. कंपनीस २४,०७० रु. नफा झाला. मेसर्स शापुरजी, गोडबोले आणि कं. हे कंपनीचे मॅनेजिंग एजंट्स आहेत.

**बी. बी. अँड सी. आय. रेल्वेचें उत्पन्न वाढलें**

१९३८–३९ च्या मानानें १९३९–४० सालीं बी. बी. अँड सी. आय. रेल्वेचें निवळ उत्पन्न ४६ लक्ष, २२ हजारांनीं वाढलें. रेल्वेच्या हिशेबाचें वर्ष मार्च, १९४० अखेर संपलें.

**दौंड-बारामती रेल्वे**

दौंड बारामती रेल्वे कं.स ३१-३-४० अखेर संपलेल्या वर्षी २५,७९६ रु. नफा झाला. भागीदारांस ४½% (प्राप्तिवरील कर वजा करणेंचा) डिव्हिडंड मिळालें. मेसर्स शापुरजी, गोडबोले आणि कं. कडे मॅनेजिंग एजन्सी आहे.

**औद्योगिक वांधे**

१९४० च्या पहिल्या तिमाहींत ब्रिटिश हिंदुस्थानांत १२८ औद्योगिक वांधे झाले, त्यांत २,७३,९९० कामगारांचे ४० लक्ष कामाचे दिवस बुडाले. ७२% वांध्यांत मुख्य वाद मजुरी अगर बोनस ह्याबाबत होता. एकूण वांध्यांपैकी २३ वांध्यांचा निकाल कामगारांस अनुकूल झाला, ३९ वांध्यांत त्यांस थोडेंफार यश आलें, ५५ वांधे त्यांचे विरुद्ध गेले व ११ वांधे तिमाही अखेर चालू होते. सर्वांत अधिक, म्हणजे ४५ वांधे, मुंबई प्रांतांत झाले; त्यांत २,०२,१९९ कामगारांचे ३२ लक्ष, ४८ हजार दिवस बुडाले. बंगालमध्यें ४३ वांधे झाले, तरी त्यांत ४९,१७१ कामगारांचे फक्त ४ लक्ष, १९ हजार दिवसांचें नुकसान झालें. कपास कापडाच्या गिरण्यांतच वांध्यांचें प्रमाण मोठें आढळलें.

**मुंबई बँकर्स क्लिअरिंग हाऊसमधील चेकसची देवघेव**

मुदत: १२ ऑगस्ट अखेरचा आठवडा
चेकसची संख्या: ९१,८२४
चेकसची किंमत: ९ कोटि, ५४ हजार रु.

**हिंदुस्थान सरकारच्या ट्रेझरी बिलांची विक्री**

मुदत: २७ ऑगस्ट अखेरचा आठवडा
बिलांची रकम: १ कोटि रु.
पडलेला व्याजाचा दर: द. सा. द. शे. १० आ. ७ पै

पुणें पोस्टस, आर. एम. एस. अँड टेलिग्राफस को. ऑपरेटिव्ह बँक लि.

वरील बँकेची वार्षिक सभा ता. ८ सप्टेंबर रोजीं ३ वाजतां भरणार आहे.

**ग्रेट ब्रिटनमधील फ्रेंच बँका**

ग्रेट ब्रिटनमधील फ्रेंच बँकांच्या शाखांच्या मुख्य कचेऱ्या बहुतेक सर्व पॅरिसमध्यें आहेत. फ्रान्समधून येणारे हुकूम आम्ही पाळणार नाहीं, असें त्या शाखांकडून लिहून घेण्यांत आलें आहे.

**जपान पर्ल्स कंपनी**

कल्चर मोत्यांच्या निर्गतीस जोराची चालना देण्याकरितां जपानी सरकार जपान पर्ल्स कंपनीच्या स्थापनेस सहाय करीत आहे.

**डिफेन्स बॉंड्स घेणारांसाठी बँकांची सवलत**

ज्यांना डिफेन्स बॉंड्स विकत घ्यावयाचे असतील, परंतु खरेदीची किंमत देतां येत नसेल, अशांच्या सोईसाठी इंपीरिअल व सेंट्रल ह्या बँकांनीं विशेष व्यवस्था केली आहे. बँकेस मान्य असलेल्या अर्जदारानें १०० रुपयांचा बॉंड घेतल्यास त्यानें बँकेस ५ रुपये रोख द्यावे व बाकीचे २४ महिन्यांत मासिक हप्त्यांनीं भरावे अशी त्याची सर्वसाधारण योजना आहे. इंपीरिअल बँक बॉंडसच्या किंमतीच्या ९५% रकम ३% दरानें कर्जाऊ देते; सेंट्रल बँक अर्जदारानें भरणा केलेल्या रकमेवर २½% व्याज देते.

**मुंबईतील कामगारांच्या रहाणीच्या खर्चाचें मान**

मुंबईतील कामगारांच्या रहाणीच्या खर्चाचें मान जून, १९३४ अखेर संपलेल्या वर्षी सरासरीनें १०० होतें, ह्या हिशेबानें १५ ऑगस्ट, १९४० अखेर संपलेल्या आठवड्यांत तें ११४, म्हणजे त्यापूर्वीच्या महिन्याच्या मानानें १ नें अधिक होतें.

**डिफेन्स लोन्स : २४ ऑगस्टपर्यंतचे आकडे**

| | रुपये |
|---|---|
| बिन व्याजाचे बॉंड | १,६४,७०,००० |
| ३% बॉंड | १९,६२,९४,००० |
| पो. ऑ. १० वर्षांचीं सर्टिफिकिटें | ६८,३९,००० |
| एकूण | २१,९६,०३,००० |

१९४०–४३ च्या ५% लोनपैकी कांहींचें रूपांतर ३% डिफेन्स-बॉंड्समध्यें करण्यांत आलें आहे, त्यांचा समावेश वरील आकड्यांत आहे.

**कोर्ट ऑफ वॉर्ड्स कडील इस्टेटी**

मुंबई प्रांतांतील कोर्ट ऑफ वॉर्ड्सकडे व्यवस्थेसाठी गेल्या वर्षी १८४ इस्टेटी होत्या. त्या वर्षांत १२ इस्टेटींची व्यवस्था कोर्ट ऑफ वॉर्ड्सनीं सोडली व ४ इस्टेटी व्यवस्थेसाठी नवीन घेतल्या. व्यवस्थेखालील इस्टेटींत ७ लक्ष, ४ हजार एकर जमीन होती. त्यापैकी २ लक्ष, ४३ हजार एकर जमिनींत लागवड केलेली होती. एस्टेटींचें उत्पन्न १६ लक्ष, १२ हजार रुपये झालें. खर्च १५ लक्ष, ९२ हजार रुपये आला. इस्टेटींच्या व्यवस्थेस आलेल्या खर्चाचें एकूण उत्पन्नाशीं प्रमाण सुमारें ९% पडलें. वॉर्ड व त्यांचे नातेवाईक ह्यांचा रोजचा खर्च व शिक्षण खर्च ह्यासाठी २ लक्ष, ७ हजार रुपयांचा विनियोग करण्यांत आला.

**प्लेग**

मुंबई प्रांतांत, २४ ऑगस्ट अखेर संपलेल्या आठवड्यांत १८१ लोकांस प्लेग झाल्याची व प्लेगनें ७८ लोक मरण पावल्याची नोंद आहे. विजापूर व सोलापूर ह्या जिल्ह्यांत प्लेगचा जोर ज्यास्त आहे. प्लेगची लस ह्या आठवड्यांत १५½ हजार लोकांस टोंचण्यांत आली; म्हणजे १ जानेवारीपासून आतांपर्यंत १ लक्ष, ५० हजार लोकांस लस टोंचून झाली आहे.

## अनुक्रमणिका

| | पृष्ठ |
|---|---|
| १ विविध माहिती ... | ४२२ |
| २ हिंदुस्थान युद्धसामुग्रीच्या उत्पादनाचें केंद्र होणार | ४२३ |
| ३ गहूं ... ... | ४२४ |
| ४ स्फुट विचार ... | ४२५ |
| हिंदुस्थान सरकारचा खर्च आणि उत्पन्न—हिंदुस्थानच्या आर्थिक सामर्थ्याचा उपयोग—सक्तीच्या विम्याची योजना—दारूबंदी—बाबत निकालावर मुंबई सरकारचें अपील-ब्रिटिश वैमानिकांचा पराक्रम—बर्लिनवर हल्ला— | |
| ५ ६% डिबेंचर्सचें ४% डिबेंचर्समध्यें रूपांतर— | |
| ६ सहकारी बँकांचे अहवाल | ४२७ |
| ७ वॉर रिस्क्स इं. फंड | ४२९ |
| ८ चीफ एजंटाचें पत्रक | ४३० |
| ९ मुंबई प्रांतातील न्यायदान | ४३० |
| १०. निवडक बाजारभाव | ४३१ |

# अर्थ

बुधवार, ता. ४ सप्टेंबर, १९४०

## हिंदुस्थान युद्धसामुग्रीच्या उत्पादनाचें केंद्र होणार

गेल्या महायुद्धांत मेसापोटेमियाच्या बाजूस लढाया चालू झाल्या तेव्हां हिंदुस्थानांतून लढाऊ सामुग्रीचा पुरवठा करणें सोयीचें होतें आणि त्याप्रमाणें ह्या देशांतून अत्यंत उपयुक्त असा माल पुरवण्यांत आला. चालू युद्ध भूमध्य समुद्र आणि आफ्रिका ह्यांच्या दिशेनें पसरलें असल्यानें तशीच परिस्थिति आतां निर्माण झाली आहे. तथापि, मागचें महायुद्ध व चालू युद्ध ह्यांच्या स्वरूपांत मोठा भेद आहे आणि त्याचे योगानें हिंदुस्थाननें पुरवावयाच्या लढाऊ सामुग्रीस विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. मागील युद्धांत इटली इंग्लंडच्या बाजूनें लढत होता, प्रस्तुत युद्धांत तो शत्रू बनला आहे. त्यामुळें ब्रिटिश व्यापाराचा ओघ भूमध्य समुद्र सोडून दुसरीकडे वळवणें प्राप्त आहे. इटलीचा पूर्व बाजूस प्रतिकार करून त्यास हतबल बनवण्याच्या कार्याला हिंदुस्थानाकडून भरपूर सहाय मिळणें आवश्यक आहे. चालू युद्धाचे वेळीं जपाननें चीनमध्यें व चीनच्या बाहेर उचल खाल्ली आहे आणि जपानी कारवायांचे संबंधांत सावधगिरि बाळगणें अगत्याचें झालें आहे. फ्रान्स ऐन वेळीं जर्मनीस शरण गेल्याकारणानें इंग्लंडला शत्रूस एकट्यानें तोंड द्यावें लागत आहे. अष्टौप्रहर इंग्लंडवर विनाशकारक विमानें पाठवून ब्रिटिश सामर्थ्य इटलीच्या करवीं दुभंगावयाचें आणि त्याचवेळीं जपानच्या पूर्व एशियांतील हालचालींचा फायदा घ्यावयाचा हे हिटलरचे डावपेच आहेत. इंग्लंडच्या व्यापाराची नाकेबंदी करण्याचा आपला संकल्प त्यानें जाहीर केलाच आहे; तो किती फलद्रूप होत आहे आणि होईल हा प्रश्न वेगळा. जर्मन विमानांच्या हल्ल्यांपासून इंग्लंडचा बचाव करून वेळ येतांच शत्रूवर उलट हल्ले चढवण्याचें ब्रिटिश धोरण स्पष्ट दिसत आहे. जरूर पडल्यास आणखी दोन वर्षें युद्ध चालू ठेवून हिटलरशाहीचा बीमोड करण्याचा आपला निश्चय मि. चर्चिल ह्यांनीं नुकताच व्यक्त केला आहे. ब्रिटिश विमानें व आरमार नुसतें इंग्लंडचें संरक्षण करूनच स्वस्थ बसलीं नसून जर्मनीच्या मोक्याच्या ठिकाणांवर हल्ले चढवून शत्रूचें बळ खच्ची करण्याचा रोजचा क्रम त्यांनीं चालू ठेवला आहे. ह्याचा परिणाम जर्मनीच्या लढाऊ तयारीवर व बळावर झाल्यावांचून रहाणें अशक्य आहे.

प्रस्तुत युद्धाचें सध्याचें स्वरूप ह्या प्रकारचें आहे. जर्मनीची शक्ती आतांपर्यंत लढाऊ विमानांच्या संख्याधिक्यांत प्रतीत झाली आहे. नियोजिलेल्या युद्धाची तयारी हिटलरनें पांच वर्षें सारखी चालवली होती; इंग्लंडचा प्रयत्न युद्ध टाळून युरोपमध्यें शांततामय परिस्थिति उत्पन्न करण्याचा होता. ह्या कारणानें लढाऊ विमानांचा पुरवठा इंग्लंडपाशीं मर्यादित होता; अलीकडे तो झपाट्यानें वाढत असून त्याची मजल जर्मनीच्यापुढें लवकरच जाईल. फ्रान्सचें सहाय बंद झाल्यामुळें उद्भवलेली अडचणहि दूर केली जात आहे. अमेरिकेची मदत वाढत्या प्रमाणांत होत असल्यानें इंग्लंडची युद्धसामुग्रीच्या बाबतींतली परिस्थिति अधिक अनुकूल झाली आहे. इंग्लंडच्या विरुद्ध चोहोंकडून उठावणी करण्याचें हिटलरचें धोरण लक्षांत घेतां आणि तें निष्फळ करून जर्मनी व इटली ह्यांचा पुरा पराजय करण्याचा ब्रिटिश मुत्सद्यांचा निश्चय पहातां ब्रिटिश साम्राज्यांतर्गत देशांची तयारी विस्तृत प्रमाणांत पण एकसूत्रीपणानें होण्याची आवश्यकता किती आहे हें उघड होईल. कॅनडा व अमेरिका ह्यांनीं अमेरिका खंडाच्या रक्षणाची एक योजना एकत्र मान्य केली आहे. पश्चिमेच्या बाजूस हा संघटित प्रयत्न होत आहे. त्याच प्रकारची योजना एशिया खंडाच्या बाजूस होणें अगत्याचें आहे ह्यांत शंका नाहीं. आकाशयानें बनवण्याच्या व तीं इंग्लंडला पुरवण्याचे कामीं ऑस्ट्रेलियानें चालवलेली खटपट प्रसिद्धच आहे. हिंदुस्थानांतून लढाऊ माल पुरवण्याची व्यवस्था झाली आहे आणि तिचा विस्तार सारखा चालू आहे.

निरनिराळ्या युद्धक्षेत्रांत लागणारी सामुग्री तयार करण्याचे कार्यांत एकसूत्रीपणा येण्याचें फार महत्त्व आहे. ह्या सामुग्रीचा कच्चा व पक्का माल आणि त्याचे कारखाने ह्यांची वांटणी कार्यक्षम रीतीनें होईल अशी व्यवस्था करण्याची आवश्यकता ब्रिटिश सरकारास भासली असून, तिच्या विषयींची चर्चा व योजनेची आखणी हिंदुस्थानांत व्हावी असें ठरलें आहे. ह्या देशाच्या मध्यवर्तित्वाचा फायदा ह्या वाटाघाटीस व योजनेस होणार आहे. हिंदुस्थान नुसता कच्चा माल पुरवील एवढेंच नाहीं, तर युद्धसामुग्रीचे अनेक कारखाने येथें चालवतां येणें शक्य आहे. औद्योगिक उत्पादनाचें संघटन ह्या देशांत युद्धाच्या प्रसंगानें झालें असतां हिंदुस्थानच्या आर्थिक प्रगतीस त्या योगानें जोराची चालना मिळण्याची शक्यता आहे. ब्रिटिश साम्राज्यांतील पौरस्त्य देशांच्या तज्ञ प्रतिनिधींची युद्ध सामुग्री परिषद दिल्ली येथें येत्या ऑक्टोबर महिन्यांत भरावयाची असून तिचें उद्घाटन व्हाइसरॉय करतील. लढाऊ सामानाच्या पुरवठ्याची चर्चा करण्यासाठीं त्याच वेळीं इंग्लंडहून एक तज्ञ इकडे यावयाचे आहेत. दिल्लीस भरणाऱ्या परिषदेंत सर महमद झाफरुल्लाखान, सर जरेमी रेसमन, फडनवीस, सर रामस्वामी मुदलियार, व्यापारमंत्री, सर क्लेमंट आर्मिटेज, फौज खात्याचे प्रतिनिधि हे हिंदुस्थानच्या वतीनें चर्चेमध्यें भाग घेतील. प्रत्येक देशाच्या आर्थिक सामर्थ्याचा अधिकांत अधिक उपयोग कसा करून घेतां येईल ह्याचा निर्णय दिल्ली परिषदेंत होईल. त्यांत हिंदी कारखानदार आणि व्यापारी ह्यांचा सल्ला घेतला जाण्याची व्यवस्था हिंदुस्थान सरकारनें करणें आवश्यक आहे. दिल्ली परिषद सरकारांचे अधिकारी व त्यांचे प्रतिनिधि ह्यांची असली तरी युद्धसामुग्रीचें उत्पादन व पुरवठा करण्याचे कामीं हिंदी धंदेवाल्यांचें सहकार्य लागणार आहे. तसेंच, त्या परिषदेच्या निर्णयाचा निकट संबंध हिंदुस्थानच्या औद्योगिक भवितव्याशीं

येणार आहे. येथील मध्यवर्ती राज्यकारभार जबाबदार पद्धतीच्या स्वरूपाचा नाहीं म्हणून हिंदी कारखानदार व व्यापारी ह्यांचा सल्ला विशेषेंकरून आवश्यक आहे. हा उद्देश सफल होईल अशी तोड हिंदुस्थान सरकारास काढतां येईल. युद्ध यशस्वी करण्यास ह्या देशाचें पूर्ण सहाय त्या योगानें होईलच. पण शिवाय, त्यास हिंदी जनतेचा हार्दिक पाठिंबा मिळण्याचें श्रेय सरकारच्या पदरीं पडेल.

---

## गहूं

### युरोपांत दुष्काळ ?

येत्या हिवाळ्यांत युरोपांत अन्नाचा दुष्काळ पडणार, आणि त्यामुळें अनेक लोकांचे हाल होणार, अशी बातमी प्रसिद्ध झाली आहे. अन्नाचा तुटवडा म्हणजे मुख्यतः गव्हाचा तुटवडा होय. श्वेतवर्णीय लोकांचें ब्रेड वांचून चालत नाहीं आणि ही ब्रेड गव्हाचीच केलेली असते. जगांतील गव्हाचें सर्व पीक एकाद्या मोसमांत बुडालें, तर एकूण लोकसंख्येपैकी निम्म्याची उपासमार होईल, अशी स्थिति आहे. हिंदुस्थानांत फक्त पंजाबखेरीज इतर प्रांतांत गव्हाचे अन्नाचा मुख्य भाग म्हणून प्राधान्य नाहीं. त्या प्रांतांतून गव्हाची लागवड सुरू झाली आणि वाढली याचें कारण गहूं निर्गत करून भाव चांगला मिळण्याची अपेक्षा, हें होय.

### ग्रेटब्रिटनचा पुरवठा

युरोपांतील कित्येक जमिनींची हिटलरच्या युद्धामुळें नासधूस झाली आहे. पावसाचा अभाव व कडक थंडी ह्यांमुळेंहि युरोपांतील गव्हाचें पीक नेहेमीप्रमाणें आलेलें नाहीं, असें प्रसिद्ध झालें आहे. हॉलंड, बेल्जम, फ्रान्स, हे देश दरसाल गहूं आयात करीत असत, ती आतां होणें अशक्य झाल्यामुळें गव्हाचा तुटवडा अधिक भासेल, हें उघड आहे. इटलीची अशीच परिस्थिति आहे. ग्रेट ब्रिटनला मात्र, जोंवर समुद्रावरील आगबोटींची वहातुक चालू आहे, तोंवर गव्हाचा तुटवडा भासण्याचें कारण नाहीं आणि ह्या वहातुकीची नाकेबंदी जर्मनीस करतां येणें अशक्य आहे. ग्रेट ब्रिटनमध्यें मुख्यतः कॅनडा, अर्जेंटिना व ऑस्ट्रेलिया येथून गव्हाची आयात होते. अर्थात्, त्या बाबतींत गव्हाचा अनुक्रम पहिला लागतो. कॅनडानें गव्हाचें उत्पादन वाढविण्याची शिकस्त चालविली आहे. युरोपांतील राष्ट्रें युद्धाच्या तयारीवर पैसा खर्च करीत असतांना त्यांस गव्हाच्या सुधारणेकडे व त्याचें पीक वाढवण्याकडे लक्ष देण्यास सवड झालेली नाहीं; ह्या उलट कॅनडा, वगैरे देशांनीं शेती सुधारणेकडे विशेष लक्ष पुरविलेलें आहे. त्यामुळें तेथें उत्कृष्ट दर्जाचा गहू होतो. रशियांत गव्हाची लागवड मोठ्या प्रमाणावर होत असली, तरी खुद्द रशियांतच तो मोठ्या प्रमाणावर खपतो.

### ग्रेटब्रिटनमध्यें गहू कसा येतो ?

तीन ते सहा हजार मैलांवरून गहू आयात केल्याखेरीज ब्रिटिश लोकांचें चालणार नाहीं. ही आयात करतांना अनेक गोष्टींची दक्षता बाळगावी लागते. मुख्य म्हणजे, वहातुकीचा खर्च अगदीं स्वस्त झाला पाहिजे. आगगाडीच्या वॅगन्समधून समुद्र किनारीं गहू येतो, तो एलेव्हेटर्समध्यें ओढून घेण्याचें काम सफाईन येथें करतात. तेथें त्याचें वजन होऊन व तो स्वच्छ केला जाऊन प्रतवार लावली जाते आणि आगबोटींत भरला जाण्यास तो सज्ज होतो. गहू आगबोटींत भरण्याचेंहि काम दक्षतेचें असतें. कॅनडांतील मॅनिटोबा प्रांतांत जेथें गहू भरला जातो, तेथून तलावांचे मार्गानें मॉंट्रिअल १,२१५ मैल आहे व तेथून ग्रेटब्रिटन २,७८५ मैल दूर आहे. गव्हाचा हा सर्व प्रवास चालू असतांना त्याची काळजी घ्यावी लागते व तो एका ठराविक उष्णतेंत ठेवावा लागतो.

### हिंदी गव्हाची निर्गत

हिंदी गहू १८७० पर्यंत निर्गत होत नव्हता; परंतु सुएझ कालव्यानें हिंदुस्थान व युरोप ह्यांमधील अंतर तोडल्यामुळें संयुक्त प्रांतांतील गहूं युरोपांतील बाजार पेठांस जवळ पडूं लागला. प्रथम ह्या गव्हाची निर्गत कलकत्ता बंदरांतून होत असे; पुढें रेल्वेचे नवीन रस्ते झाल्यामुळें मुंबई जवळ पडूं लागली आणि अखेर पंजाबांत कालव्यांच्या पाण्याची व्यवस्था होऊन तेथें गव्हाची लागवड वाढली आणि कराची मार्गें त्याची निर्गत होऊं लागली. लायलपूरसारख्या दूरच्या केंद्रांतून गव्हाची खरेदी केली जाऊन तो गहू तेथें पोत्यांत भरला जातो व तेथून तो आगगाडीनें कराचीस आणण्यांत येतो. तेथें त्याची विक्री होते ती ६५६ पौंडांची खंडी ह्या हिशेबानें होते. २ हंड्रेडवेटच्या पोत्यांतून गहूं बाहेर पाठविला जातो. कराची येथें ५ इंचांपेक्षां अधिक पाऊस सहसा पडत नाहीं, त्यामुळें तेथें गहूं साठविण्याची विशेष व्यवस्था करावी लागत नाहीं. मुंबईंत पाऊस फार पडतोच, पण शिवाय पावसाळ्याखेरीज बाकीच्या वेळींहि तेथें हवेंत आर्द्रता अधिक असते.

### सिंधमधील नवी लागवड

सिंध प्रांतांत सक्करच्या धरणाखालील जमिनींत गव्हाची लागवड आतां मोठ्या प्रमाणावर होऊं लागली असून, हिंदुस्थानांत गव्हाचा खप वाढला तरी त्या मानानें निर्गतीस अधिक गहू उपलब्ध होईल, हें उघड आहे. इंपीरिअल कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल रिसर्च हिंदी गव्हाची जात व त्याचें उत्पादन वाढविण्याचे प्रयत्न व त्या संबंधांत संशोधन करीत आहे.

भ्रमर आणि कमलिनी
यांना
सहवासी सुखाचें भाग्य लाभलें नाहीं.
कारण ?
ल पं डा व
नवयुगचा
मराठी बोलपट
: भूमिका :
♣ मीनाक्षी
♣ वनमाला
♣ विनायक
♣ बाबूराव पेंढारकर
♣ साळवी
♣ पवार
६वा मुंबईंत
व
३रा पुण्यांत
आठवडा
मिनर्व्हा—पुणें.
न्यू वेस्ट एण्ड—मुंबई
: प्रकाशक :
पिअरलेस पिक्चर्स, मुंबई नं. ४.

## स्फुट विचार

### हिंदुस्थान सरकारचा खर्च आणि उत्पन्न

हिंदुस्थानचा युद्धसंबंधांतला खर्च वाढत जाणें ही गोष्ट अपेक्षित अशीच आहे आणि नवीन करयोजनेमुळें देशाच्या उत्पन्नांतहि भर पडणार आहे. तथापि, उत्पन्न व खर्च ह्यांची तोंडमिळवणी शक्य होणार नाहीं आणि त्यांमधील तफावत कर्जाच्या सहायानें भरून काढावी लागेल. हिंदुस्थान सरकारच्या चालू उत्पन्न-खर्चाच्या आकड्यांवर वेळोवेळ नजर टाकणें ह्या दृष्टीनें उद्बोधक व आवश्यक होणार आहे. चालू वर्षाच्या, एप्रिल व मे ह्या पहिल्या दोन महिन्यांतील मध्यवर्ती सरकारच्या उत्पन्न-खर्चाचे आकडे नुकतेच प्रसिद्ध झाले आहेत, त्यांवरून असें दिसतें की ह्या मुदतींत तुटीची रकम २ कोटि, ७० लक्ष रुपये इतकी भरली. उत्पन्न १८ कोटि, ३ लक्ष आलें आणि खर्च २० कोटि, ७३ लक्ष रुपये झाला. कस्टम्स व मीठ ह्यांच्या उत्पन्नांत पूर्वीच्या वर्षाच्या दुमाहीच्या मानानें अनुक्रमें करून ८७ लक्ष व ३६ लक्ष रुपये घट झाली, पण उत्पन्नाच्या इतर सर्व बाबींमध्यें वाढ झाली. एक्साइज, कॉर्पोरेशन टॅक्स, प्राप्तीवरील कर व पोस्ट-टेलिग्राफ ह्यांच्या उत्पन्नांतील वाढ दृष्टींत भरण्यासारखी आहे. रेल्वेजच्या उत्पन्नांत विशेष वाढ झाली आहे आणि तिचा आकडा ५ कोटि, ८२ लक्ष रुपये असा आहे आणि तो अंदाजाचे मानानें फार मोठा आहे. गेल्या वर्षाच्या एप्रिल-मे महिन्यांच्या पेक्षा २ कोटि, ९६ लक्ष रुपयांनीं यंदाच्या ह्या दोन महिन्यांच्या मुदतींत हिंदुस्थान सरकारचें उत्पन्न वाढलें. खर्चाच्या बाजूकडे पाहिलें असतां संरक्षणाच्या बाकीवरील खर्चात ३ कोटि ३६ लक्षांचा वाढावा झालेला दिसून येतो. दोन महिन्यांचा लष्करी खर्च १० कोटि, ३५ लक्ष रुपये झाला आणि इतर बाबींवरील खर्चाची रकम ४ कोटि, २० लक्ष रुपये भरली. गेल्या वर्षाच्या पहिल्या दोन महिन्यांत १६ कोटि, ४५ लक्ष रुपये खर्चले गेले होते; चालू वर्षाच्या तत्सम मुदतींतला खर्च ४ कोटि, २८ लक्ष रुपयांनीं अधिक झाला.

### हिंदुस्थानच्या आर्थिक सामर्थ्याचा उपयोग

चालू युद्धाच्या विस्तारास कोणत्या प्रकारचें वळण लागत आहे आणि त्याचे संबंधांत हिंदुस्थानचें सुप्त आर्थिक सामर्थ्य जिवंत आणि बलवान करण्याची शक्यता कशी आहे ह्याचें दिग्दर्शन आम्हीं आजच्या अंकांतील अग्रलेखांत केलें आहे. ह्या विषयाचें विवेचन करतांना एक इंग्रज लेखक म्हणतो:—"हिंदुस्थानचा प्रमुख धंदा शेतीचा असला तरी ह्या देशांत दगडी कोळसा, लोखंड, राकेल, मॅंगेनीज वगैरे खनिज पदार्थांचा पुरवठा मोठा आहे. गळिताचीं धान्यें, कपास, ताग व रेशीम हा मालहि तेथें मोठ्या प्रमाणावर उत्पन्न होतो आणि स्थानिक गरजा भागून त्यांत शिल्लक रहाते ती बाहेर पाठवतां येते. लोखंड व पोलाद ह्यांचें उत्पादन युद्धसामुग्रीचे दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें असून त्याचे बाबतींत ब्रिटिश साम्राज्यांत हिंदुस्थानचा नंबर इंग्लंडच्या खालोखाल लागतो." युद्धसामुग्रीच्या पुरवठ्यांत हिंदुस्थानला किती महत्वाचा भाग उचलतां येईल हें यावरून स्पष्ट होईल. अलीकडच्या फौजा यंत्रमय झाल्या असून माणसांपेक्षा यंत्रांचें महत्त्व त्यांमध्यें अधिक झालें आहे. यंत्रमय सैन्याच्या घटनेंत ३५ ते ४० हजार निराळ्या वस्तूंची जरूर भासते. त्यांचेपैकीं निम्म्या वस्तू आतां हिंदुस्थानांत तयार होत आहेत. भिन्न भिन्न जातींचा दारू-गोळा, बंदुका, बॉंब, सुरुंग इत्यादि शस्त्रास्त्रें येथें बनवण्यांत येत आहेत आणि त्यांच्या उत्पादनाचा विस्तार झपाट्यानें चालू आहे. हिंदी सैन्यास लागणारी बहुतेक सामुग्री ह्या देशांत तयार होत आली आहे. मोटारी व विमानें मात्र येथें बनवण्यांत आलेलीं नाहींत. चालू युद्ध लांबलें तर त्यांचेंहि उत्पादन हिंदुस्थानांत होऊं लागेल अशी अपेक्षा आहे. ह्या देशाच्या भावी आर्थिक शक्तीकडे पहाण्याच्या दृष्टींत युद्धामुळें अनुकूल बदल होत आहे. ह्या परिस्थितीचा विधायक रीतीनें उपयोग करून घेण्यांत सरकार आणि जनता ह्यांचें पूर्ण सहकार्य होणें अगत्याचें आहे.

### सक्तीच्या विम्याची योजना

युद्धविषयक धोक्याच्या सक्तीच्या विम्याची सरकारी योजना प्रसिद्ध झाली आहे, तिचा सारांश "अर्था"च्या गेल्या अंकांत देण्यांत आलेलाच आहे. सर्वसाधारणपणें ह्या योजनेचें व्यापारी व कारखानदार ह्यांनीं स्वागत केलें आहे. हप्त्यांचा दर द. म. ३/४% ठेवण्यांत आला आहे, तो व्यापारी वर्गाच्या स्वतःच्याच सूचनेपेक्षा भारी नाहीं. नियोजित विम्याचे योजनेनें मालाच्या नाशापासून संरक्षण मिळण्याची व्यवस्था केली आहे, परंतु कारखान्यांच्या व गोदामांच्या इमारतींचा तीमध्यें अंतर्भाव झालेला नाहीं, ह्यामुळें पूर्ण संरक्षण मिळूं शकणार नाहीं, अशी एक तक्रार आहे. हप्त्यांचे दर मुंबईसारखें केंद्र व अंतर्गत जिल्हा ठिकाण ह्या दोन्हीं जागीं सारखेच आहेत, हें योग्य नाहीं, अशी हप्ते आकारणीविरुद्ध टीका ऐकूं येते, ती रास्त आहे असें वाटतें. मुंबईसारख्या ठिकाणीं धोका इतर ठिकाणापेक्षा अधिक आहे, हें उघड आहे. परंतु बंदरांचा व्यापार सुरळीत चालावा, प्रमुख व्यापारी ठिकाणीं सुरक्षितपणा वाटून बाजारभावांत चलबिचल होऊं नये, अंतर्गत व्यापारांत अडचण येऊं नये, इत्यादि कारणांसाठीं अंतर्गत ठिकाणच्या व्यापाऱ्यांस त्यांच्या धोक्याचे मानानें जरा ज्यास्त दरानें हप्ते भरावयास लावलें जाणार आहे. देशाचा घाउक व प्रमुख ठिकाणचा व्यापार सुरळीत चालण्यावरच सर्व व्यापारी उलाढाली अवलंबून असतात; तेव्हां महत्त्वाच्या ठिकाणीं सुरक्षितपणाची भावना निर्माण होण्यासाठीं व ती टिकण्यासाठीं इतर ठिकाणच्या व्यापाऱ्यांवर थोडा अप्रमाण बोजा बसला, तर तो असमर्थनीय होणार नाहीं. हप्त्यांचे दर धोक्याप्रमाणें तोलून कमी अधिक ठेवणें अशक्यप्राय आहे आणि त्यांत न्याय-अन्याय होण्याचा संभव अधिक आहे, हें उघड आहे. सरकारनें युद्धविषयक धोक्याची जोखीम पत्करून अभिनंदनीय धोरण स्वीकारलें आहे. त्याच तत्त्वाचा अंगीकार इतर आर्थिक बाबींतहि त्यानें करावा, अशी जनतेची अपेक्षा आहे. सक्तीच्या नियोजित विम्याचे योजनेंत सुमारें ६ अब्ज रुपयांचा माल येईल व १४७ आगीच्या विमा कंपन्यांमार्फत ह्या मालाच्या विम्याचे हप्ते गोळा केले जातील. युद्धविषयक धोक्याचा विमा उतरावयाचा, म्हणजे आगीच्या विम्याची पॉलिसी घेतली पाहिजे, हें उघड आहे.

### दारूबंदीबाबत निकालावर मुंबई सरकारचें अपील

१९ एप्रिल १९४० रोजीं एक मनुष्य बी. बी. अॅंड सी. आय. रेल्वेच्या दादर स्टेशनवर उतरला, त्यावेळीं त्याचेजवळ देशी दारूची एक बाटली सापडली, त्यांत १½ ड्रॅम दारू होती.

त्यावेवर अबकारी कायद्याच्या ४३ व्या कलमाखाली प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटच्या कोर्टीत खटला भरण्यांत आला. मॅजिस्ट्रेटनें खटल्यांतील कांहीं महत्त्वाच्या प्रश्नांसंबंधानें हायकोर्टाकडे विचारणा केली, तेव्हां हायकोर्टानें " मुंबई शहरांत दारूबंदी करणारा मूळ जाहिरनामा कायदेशीर नाहीं, गव्हर्नर्स ॲक्टानें तो कायदेशीर होऊं शकत नाहीं आणि कस्टम्सच्या सीमेवरून दारूची आयात-निर्गत करण्यास प्रतिबंध होईल असा कायदा करण्याचा अधिकार प्रांतिक विधिमंडळास नाहीं " असा अभिप्राय व्यक्त केला. त्यास अनुसरून प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटनीं निवाडा केला. विलायती दारूची संवय असणारांची पूर्ण दारूबंदीमुळें होणारी गैरसोय थोडी दूर करावी असें सरकारास त्यापूर्वीच कांहीं काळ वाटत होतें. त्यास अनुसरून सरकारनें विदेशी दारूबाबत अटी सढळ केल्या. दारूबंदीच्या क्षेत्रांत देशी दारू अगर ताडी विकणें बेकायदा झालें, तरी तिची आयात करणारांस ती पितां येणें शक्य झालें. विदेशी दारूच्या विक्रीचा परवाना असलेल्या दुकानांत ती मिळूं लागली व आतां तर सरकारनें रेस्टॉरंट्स, हॉटेल्स व क्लब ह्यांत ती मिळण्याची सोय केली आहे. हायकोर्टाच्या फुल बेंचाच्या निकालाविरुद्ध फेडरल कोर्टाकडे अपील करण्यासाठी सर्टिफिकेट मागावयाचें किंवा नाहीं हें ठरविण्याकरितां सरकारी ॲडव्होकेट जनरलनीं मुदत मागून घेतली होती. आतां मुंबई सरकारनें हें सर्टिफिकेट मागावयाचें ठरविलें असून त्याप्रमाणें हायकोर्टाकडे अर्ज दाखल केला, तो सोमवारीं सर न्यायाधीश व न्यायमूर्ति वासुदेव ह्यांचेपुढें सुनावणीस निघाला. सरकारच्या अपिलाचा निकाल सरकारास अनुकूल लागला, तरी दारूबंदीचें धोरण किती नेटानें चालू ठेवावयाचें हा सरकारच्या इच्छेचा प्रश्न असल्याकारणानें दारूबंदी करण्याचा अधिकार कायम राहून केवळ भागणार नाहीं, हें उघड आहे. तथापि सरकारनें अपिलाचा प्रयत्न चालविला आहे हें स्तुत्य आहे. सरकारनें दारूबंदीच्या धोरणांत —जें धोरण जनतेच्या प्रतिनिधींनी आखून दिलेलें आहे त्यांत— बदल करूं नये असा लोकांचा आग्रह आहे. जनतेस दारूबंदीच हवी आहे.

---

### ब्रिटिश वैमानिकांचा पराक्रम—बर्लिनवर हल्ला

ब्रिटिश बेटांस वेढा देऊन आपल्या विमानांच्या सहायानें त्यांस जिंकण्याचा हिटलरचा बेत सपशेल फसला आहे, इतकेंच नव्हे, तर ब्रिटिशांचें वैमानिक सामर्थ्य जर्मनीस आतां चांगलेंच जाणवूं लागलें आहे. आपल्या विमानांच्या हल्ल्यांनीं आपण ब्रिटिश सरकार व जनता ह्यांस घाबरवून टाकूं अशी हिटलरची कल्पना होती, ती त्यांनीं खोटी करून दाखविली आहे. जर्मन विमानांच्या लाटांवर लाटा येऊन बॉंबचा वर्षाव त्यांचे मधून सतत होत असतां ब्रिटिश जनता धैर्यानें, धिमेपणानें व निश्चयानें शत्रूच्या हल्ल्यास तोंड देत आहे ह्याविषयीं तिचें कौतुक करणें आवश्यक आहे. ह्या बाबतींत ब्रिटिश विमानांनीं चालवलेला पराक्रम वर्णनीय आहे. जर्मन विमानांचे काफिले दररोज सारखे ग्रेटब्रिटनच्या निरनिराळ्या भागांवर चालून जात आहेत, पण त्यांचा प्रतिकार ब्रिटिश विमानें यशस्वी रीतीनें करीत आहेत. जर्मनीचीं हजार—अकराशें विमानें अलीकडे खालीं पाडण्यांत आलीं आहेत आणि शत्रूच्या मानानें ब्रिटिश वैमानिक दलाचें फारच थोडें नुकसान झालें आहे. .... देश काबीज झाल्यावर इंग्लंडची तीच अवस्था आपण करूं अशी धमकी हिटलरनें दिली होती ती आतां निष्फळ झाली आहे, एवढेंच नव्हे, तर इंग्लंड शत्रूच्या अंगावर बाजू उलटवीत आहे. जर्मनीच्या हल्ल्यांपासून स्वतःचा बचाव करण्याचेंच धोरण अवलंबून ब्रिटिश सरकार राहिलेलें नाहीं. त्यानें जर्मनीचे लढाऊ सामुग्रीचे कारखाने, विमानगृहें, गोद्या, इत्यादींचा नाश पद्धतशीर रीतीनें चालविला आहे. गेल्या आठवड्यांत ब्रिटिश वैमानिकांनीं बर्लिनमधील युद्धोपयोगी इमारतींवर हल्ले चढवले आणि त्यामध्यें शत्रूचा बराच नाश केला, ही गोष्ट शत्रूसहि कबूल करावी लागली आहे. ब्रिटिश विमान दलाचें वाढतें बळ आणि जर्मन विमानांचे अयशस्वी प्रयत्न ह्या गोष्टी आतां आपल्या लोकांपासून झाकून ठेवणें हिटलरला शक्य नाहीं.

---

### ६% डिबेंचर्सचें ४% डिबेंचर्समध्यें रूपांतर

१९४१–४५ मध्यें परत फेडावयाचीं ६ टक्के व्याजाचीं डिबेंचरें परत फेडण्यास आंध्र व्हॅली पॉवर सप्लाय कंपनीनें जी सवलत घेऊन ठेवलेली आहे, तीस अनुसरून वरील सर्व डिबेंचर्सची परतफेड १ जुलै १९४१ रोजीं करण्यांत येईल, असें कंपनीनें जाहीर केलें आहे. कंपनीचा ४% दराचीं १ कोटि, १० लक्ष रुपयांचीं डिबेंचर्स काढण्याचा विचार आहे. त्यांपैकी १ कोटींची परतफेड १ ऑक्टोबर, १९५२ रोजीं केली जाईल. डिबेंचर्स अंडर राइट करण्यांत येतील. नियोजित ट्रस्टडीडच्या ट्रस्टींना कंपनीचा लायसेन्स, मालमत्ता इत्यादि लावून दिली जाईल, व त्यासाठी इंडियन इलेक्ट्रिसिटी ॲक्टाप्रमाणें आवश्यक ती सरकारी परवानगी विचारण्यांत आली आहे. सध्याचीं ६% चीं मॉर्टगेज डिबेंचरें धारण करणारांचे, आपलीं डिबेंचरें देऊन बदली नवीन ४% च्या डिबेंचरांकरितां येणारे अर्ज प्रथम विचारांत घेतले जातील. आपलीं डिबेंचर्स ज्यांस वर सांगितल्याप्रमाणें बदलून पाहिजे असतील, त्यांनीं ७ सप्टेंबरचे १९४० चे आंत कंपनीकडे अर्ज करावा.

---


दी कराड अर्बन को—ऑपरेटिव्ह बँक लि., कराड.

## भागीदारांस नोटीस

कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँकेच्या भागीदारांची तेविसावी वार्षिक साधारण सभा रविवार तारीख २२।९।४० रोजीं दुपारीं एक वाजतां बँकेच्या इमारतींत भरणार आहे. सभेमध्यें अहवाल व ताळेबंद मंजूर करणें, नफ्याची वांटणी मंजूर करणें, पोट-नियम दुरुस्ती मंजूर करणें, डायरेक्टर्स, अध्यक्ष व व्हाइस चेअरमनची निवडणूक करणें वगैरे कामें होतील.

सदर वेळीं सर्व सभासदांनीं अगत्य येणेंचें करावें अशी विनंति आहे.

कराड, तारीख २५।८।४० — व्यंकटेश पांडुरंग जोशी, मॅनेजिंग डायरेक्टर

ग्रामणी — मासिक वर्ष १ लें. वा. व. म. आ. नें २ रु. शेतकऱ्यांचा जीवलग मित्र, या. धंदा. मार्गदर्शक, ग्रामसेवकांना उत्साहप्रद, विद्यार्थ्यांना उद्बोधक, व्यापारी मालाचा प्रसारक, मुंबई व मध्यप्रांत विद्याखात्याकडून मंजूर.

श्री. ना. कुंभार, सं. ग्रा., नागपूर.

# सहकारी बँकांचे अहवाल

## पुणें सेंट्रल को. बँक लि.

वरील बँकेचें भरणा झालेलें भांडवल ३,७९,९३० रुपये असून तें २,४३८ व्यक्तिशः समासद व २५९ सोसायट्या ह्यांनीं घेतलेलें आहे. बँकेच्या सेढ, इंदापूर, दौंड, जुन्नर, सासवड व डेक्कन जिमखाना येथें शाखा आणि फर्ग्युसन कॉलेज येथें उपशाखा आहेत. बँकेकडे एकूण ४४ लक्ष, ९१ हजारांच्या ठेवी आहेत, त्यांपैकी १० लक्ष, २८ हजार रुपये सार्वजनिक संस्था व सहकारी सोसायट्या ह्यांच्या आहेत. गंगाजळी ठेव १ लक्ष, ३४¾ हजारांची असून प्रॉव्हिडंड फंडांत ४६½ हजार रुपये, इमारत घसारा फंडांत ४६½ हजार रुपये, डिव्हिडंड ईक्लायझेशन फंडांत ९½ हजार रुपये, बुडीत व संशयित कर्ज फंडांत २३ हजार रुपये, वगैरेप्रमाणें रकमा आहेत. बँकेच्या एकूण खेळत्या भांडवलापैकीं २ लक्ष, १३¾ हजार रुपये जवळ शिल्लक व ३०½ लक्ष रुपये सरकारी रोखे, डिबेंचर्स, प्रॉ. बँकेचे शेअर्स, इंडियन इस्ट ॲक्टप्रमाणें गुंतविलेली रकम, कायम ठेव, वगैरेंत आहे. ताळेबंदांत २३ लक्ष, ९०½ हजारांच्या सरकारी प्रॉमिसरी नोटा, वॉर बॉंड्स वगैरे दाखविलेले आहेत, त्यांची दर्शनी किंमत २४ लक्ष ३४¾ हजार असून बाजारभावानें होणारी किंमत २३ लक्ष, ९९½ हजार रुपये आहे.

वरील आकड्यांवरून बँकेच्या पैशाच्या तरतेपणाची कल्पना येईल. कायम ठेवी, सरकारी रोखे, सोनें, चांदी, प्रॉपर्टी वगैरेचे तारणावर बँकेनें २ लक्ष, ४५ हजार रुपये दिले आहेत. शेतकी सोसायट्यांस ९ लक्ष ७९ हजार रुपये, हाउसिंग सोसायट्यांस १ लक्ष, १६ हजार रुपये व बिगर शेतकी मंडळयांस २ लक्ष, ६४ हजार रुपये कर्ज व क्रेडिट ह्यांचे स्वरूपांत दिलेले आहेत. कोठार कर्जांत ५२½ हजार रुपये गुंतलेले आहेत. बँकेस जोडलेल्या सोसायट्यांपैकी फक्त २ च अ वर्गांत व ३४ ब वर्गांत आहेत. सेफ कस्टडी व्हॉल्टची योजना लोकप्रिय होत चालली असून व्हॉल्टमध्यें नवीन लॉकर लवकरच लागतील, असें दिसतें. बँकेजवळील रोख्यांची दर्शनी किंमत ठराविक मुदतीनंतर पुरेपूर मिळावयाची असल्यामुळें, या फरकाची तरतूद करण्याची आवश्यकता नाहीं, असें बोर्डाचें धोरण आहे, तें बरोबर आहे. "केवळ सोसायट्यांचे व्यवहारावर अवलंबून राहिल्यास बँकेस योग्य तो नफा सद्यःस्थितींत मिळवितां येणार नाहीं, हें उघड आहे. शेतकऱ्यांची अलीकडील परस्थिति लक्षांत घेऊन, बँकेनें सोसायट्यांना किमान दरानें व्याज गेलीं तीन वर्षें आकारूनहि सोसायट्यांबरोबर होणाऱ्या व्यवहारांत बँकेस योग्य तो नफा रहात नाहीं. सबब, आपल्या बँकेस पोटनियमानुसार करतां येतील असे बँकिंगचे दुसरे व्यवहार हल्लींपेक्षा अधिक प्रमाणांत करण्याचें धोरण यापुढें आपणांस ठेवावें लागेल," असें स्पष्ट मत बोर्डानें अहवालांत नमूद केलें आहे. "अशा प्रकारें दुसरे व्यवहार अधिक प्रमाणांत केल्याशिवाय शेतकी सोसायट्यांस बँकेकडून हल्लीं मिळत असलेल्या सवलती यापुढें चालू ठेवणें हें बँकेस परवडणार नाहीं" असाहि आपला अभिप्राय बोर्डानें व्यक्त केला आहे. वर्ष अखेर बँकेस ३०,४८२ रुपये नफा झाला, त्यांतून भागीदारांस ४% प्रमाणें डिव्हिडंड देण्याकडे १५,२०० रुपयांचा विनियोग करावा अशी बोर्डाची शिफारस आहे. बँकेचा रजत महोत्सव १९४२ मध्यें साजरा करावा लागेल त्याच्या खर्चाची तरतूद म्हणून बँकेनें या वर्षापासूनच एक फंड बाजूस काढण्याचें ठरविलें असून त्यांत १,५०० रुपये घालण्यांत यावयाचे आहेत. डिव्हिडंड कमी करण्यांत बोर्डानें प्रसंगोचित जबाबदारीची जाणीव दाखविली आहे. पुणें सें. को. बँकेची प्रगति अविरत चालली असून तिचा कारभार व तिनें आखलेलें सावधगिरीचें धोरण हीं इतर तत्सम संस्थांस आदर्शभूत झालीं आहेत. बँकेची वार्षिक सभा २२-९-४० रोजीं आहे.

## पुणें पोस्ट्स्, आर. एम. एस. ॲन्ड टेलिग्राफ्स् को. अर्बन बँक लि.

बँकेचे पटावर १,००८ सभासद असून बँकेचें भरणा झालेलें भांडवल २७,२४६ रुपये आहे. रिझर्व्ह फंडांत १०,८४७ रुपये आहेत. जामीन कसबे रिझर्व्ह फंड १,२७९ रुपयांचा झाला आहे. बँकेकडे ३६ हजारांच्या ठेवी असून तिच्या काटकसर फंडांत १ लक्ष, २३ हजार रुपये आहेत. बँकेनें सभासदांस १ लक्ष, ३३ हजार रुपयांचीं कर्जें दिलीं आहेत, त्यांची वर्गवारी खालीलप्रमाणें आहेः—जात जामिनकीवरः ७५ हजार रुपये; काटकसर फंडाचे तारणावरः २२½ हजार रुपये; पोस्टल विमा पॉलिसींचे तारणावरः ६ हजार रु. अहवालाचे सालीं पोस्ट खात्याच्या मागणीवरून जामीन कसब्यांबाबत बँकेस कांहीं एक रकम भरावी लागली नाहीं. काटकसर फंडांत सभासदांची संख्या वाढत आहे. ह्या फंडाचे रकमेवरील व्याजाचा दर (५%) ज्यास्त आहे, तो कमी होण्याची आवश्यकता रिपोर्टांत सूचित करण्यांत आली आहे. "चालू सालीं थकबाकीचें प्रमाण बरेंच वाढलें आहे. एकंदर आठ प्रकरणें मिळून ८५० रुपये रकम लवाद प्रकरणीं गुंतलेली आहे." बँकेस वर्ष अखेर २,१०४ रुपये नफा झाला, त्यांतून भागीदारांस ५% प्रमाणें डिव्हिडंड वाटण्यासाठीं १,३३० रुपयांचा विनियोग करावा अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे. बँकेची वार्षिक सभा ता. ८-९-४० रोजीं भरणार आहे.

## रावेर पीपल्स को. बँक लि.

वरील बँकेच्या एकूण २४९ सभासदांनीं ११,८७५ रुपयांचे भाग घेतलेले आहेत. संस्था "बँक" ह्या सदरांत कायम रहाण्यासाठीं तिचें भांडवल २० हजार रुपये करण्याची खटपट चालू आहे. बँकेकडे एकूण ८७,३०० रुपयांच्या ठेवी आहेत. रिझर्व्ह व इतर फंड सुमारें २,८५० रुपयांचे आहेत. वर्ष अखेर बँकेस सभासदांकडून ४१,८२१ रुपये कर्ज येणें आहे. सुमारें ११ हजार रुपये सोनें, चांदी वगैरे तारणावर दिलेले असून १,६५५ रुपयांचे ओव्हरड्राफ्ट आहेत. सरकारी कर्जरोख्यांत २४,०७५ रुपये आहेत, त्यांचा तपशील (मूळ किंमत, बाजारभावानें ताळेबंदाचे दिवशीं किंमत, दर्शनी किंमत इ.) देणें आवश्यक होतें. "दिवसेंदिवस थकबाकीचें प्रमाण वाढतें असल्यामुळें अवार्डसची संख्याहि वाढत असून या सर्वांचा परिणाम बँकेच्या प्रगतीवर होत आहे." असा रिपोर्टांत शेरा आहे. वर्षाअखेर बँकेस १,३६४ रु. १४ आ. ३ पै नफा झाला. भागीदारांस ६% डिव्हिडंड द्यावें, अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे. बँकेची वार्षिक सभा ८-९-४० रोजीं आहे.

### मराठी पीपल्स को. बँक लि.

वरील बँकेच्या पटावर ७०७ सभासद असून त्यांपैकीं २४ स्त्रिया आहेत. भागभांडवल २२,८८० वसूल झालेलें आहे. रिझर्व्ह फंडांत २,७९४ रुपये, डिव्हिडंड ईक्वलायझेशन फंडांत ४०० रुपये, वगैरे प्रमाणें रकमा आहेत. वर्षात एकूण १ लक्ष, ५८ हजार रुपयांच्या कर्जमागणीचे ५७२ अर्ज आले, त्यांपैकीं ५३२ अर्जदारांस १ लक्ष, ३४ हजारांचें कर्ज मंजूर करण्यांत आलें. कर्जांपैकीं १ लक्ष रुपयांचीं ३४१ कर्जें फळांच्या व्यापारासाठी, २ हजार रुपयांचीं ७ कर्जें केळ्यांच्या व्यापारासाठी, १०½ हजार रुपयांचीं ५९ कर्जें तरकारी व्यापारासाठी व ११ हजार रुपयांचीं ८१ कर्जें कर्जफेडीकरितां कर्जदारांनीं घेतलीं. एकूण ९५ सभासदांकडे १६½ हजार रुपये कर्ज थकलेलें आहे. रिपोर्ट छापण्याचे वेळेपर्यंत ३,३८६ रुपये थकबाकी वसूल झाली आहे. बँकेकडे एकूण सुमारें ९३ हजारांच्या ठेवी आहेत. बँकेचें ५५ हजार रुपये कर्जांत व ५½ हजार रुपये कॅश क्रेडिटमध्यें गुंतविलेले असून ५४ हजार रुपये डिबेंचर्स प्रांतिक बँकांचे भाग वगैरे गुंतविलेले आहेत. अहवालांत ह्या बाबीचा दिलेला तपशील इतर बँकांनीं अनुकरण करण्यासारखा आहे. वर्षअखेर बँकेस २६९५ रुपये नफा झाला त्यांतून भागीदारांस ५% प्रमाणें डिव्हिडंड द्यावें अशी डायरेक्टरबोर्डाची शिफारस आहे स र्व सभासदांनीं आपणांकडे थकबाकी असल्यास ती भरून बँकेचा गेलेला 'अ' वर्ग परत मिळविण्यास सहाय करावें अशी अहवालांत विनंति करण्यांत आली आहे. यंदापासून बँकेनें हुंडीचा व्यवहार करण्याचें योजिलें आहे. बँकेचे संस्थापक व प्रथमपासूनचे अध्यक्ष श्री. भास्करराव जाधव ह्यांच्या देखरेखीखाली बँकेचा कारभार चांगला चालला आहे. अहवालांत डायरेक्टरबोर्डाची बँकेसंबंधींची कळकळ दिसून येते. ही बँक मार्केटमधील फळें व भाजीवाले लोकांना सावकारी पाशांतून सोडवून, त्यांना स्वावलंबी करीत आहे असे उद्गार मद्रास सहकारी खात्याचे श्री. अय्यर व श्री. पद्मनाभन् ह्यांनीं आपल्या भेटीचे वेळीं काढले, ते यथार्थ आहेत.


---

### तासगांव अर्बन को. के. बँक लि.

ह्या बँकेचे पटावर २९७ सभासद असून त्यांनीं भरणा केलेलें भांडवल १०,२९० रुपये आहे, म्हणजे गेल्या वर्षांत २,४४० रुपयांची वाढ झाली आहे. बँकेकडे एकूण २८,८०८ रुपयांच्या ठेवी आहेत. सभासदांकडे २६,९८३ रुपये कर्ज येणें आहे. मालतारणावरील कर्जांत ९,४०० रुपयांची वाढ असून इस्टेटीच्या तारणावरील व जामिनकीवरील कर्जांत ४,००० रुपयांची घट आहे. थकबाकीचें कर्जाशीं प्रमाण ८·२५% पडतें. थकबाकीचा आकडा गेले सालापेक्षा पुष्कळच कमी आहे. साल अखेर बँकेस ६४८ रुपये नफा झाला, त्यांत डिव्हिडंड ईकलायझेशन फंडांतून घेतलेले १०३ रुपये मिळविण्यांत आले आहेत व शेकडा ३॥% डिव्हिडंड वाटावें अशी डायरेक्टर बोर्डाची शिफारस आहे. २० हजार रुपये भांडवलाची मर्यादा बँक योग्य मुदतींत गाठेल, असें भागविक्रीच्या बाबतींत तिनें गेल्या वर्षी केलेल्या प्रगतीवरून दिसतें. माल तारण व्यवहारांत बँकेने अधिकाधिक रकम गुंतविण्यास प्रारंभ केला आहे व सोनें गहाणाचा धंदाहि सुरू केला आहे. बँकेची वाढ शीघ्रगतीनें होण्यास ह्या उपक्रमाचा उपयोग होईल.


# फॅन्सी रिस्ट वॉचेस

फुकट फुकट फुकट




१९४० चें मॉडेल ऑटोमॅटिक रिव्हॉल्व्हर

लायसेन्सची जरूर नाहीं

STEVENS CO. CROMWELL CONN U.S.A.

रिव्हॉल्व्हरचा आकार वरील चित्रांत दाखविल्याप्रमाणें आहे. खऱ्याखुऱ्या रिव्हॉल्व्हरप्रमाणें दिसण्यांत असून ह्याचा तसाच आवाज होतो. ह्याचें वजन १५ औंस आणि लांबी ७ इंच आहे. नळीमध्यें ६ काडतुसें राहतात आणि तीं एकामागून एक उडवतां येतात. ह्याच्या मोठ्या आवाजानें जंगली श्वापदेंहि घाबरून पळतात आणि चोर व शत्रू ह्यांपासून रक्षणास तो उपयोगी आहे. ७७७ नंबरच्या रिव्हॉल्व्हरची किंमत ४ रु. ८ आणे आहे आणि त्याच्या बरोबर ३५ काडतुसें असतात. नं. ८८८ चें रिव्हॉल्व्हर उत्तम पोलादाचें असून त्याची किंमत ५ रु. १३ आणे आहे. त्याच्याबरोबर ७५ काडतुसें येतात. जादा १,००० काडतुसांची किंमत ३ रु. पट्ट्यासह पेटीची किंमत १ रु. १२ आणे. रिव्हॉल्व्हरसाठी तेल किं. १२ आणे. टपाल हशील वेगळें.

फुकट—प्रत्येक रिव्हॉल्व्हर बरोबर दोन फॅन्सी रिस्ट वॉचेस फुकट बक्षिस दिलीं जातात. तीन रिव्हॉल्व्हर एकदम घेणारास एक जादा बक्षिस आणि टपाल हशील माफ.

पत्ता:—अमेरिकन पिस्तुल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. ९७ (A. P.) अमृतसर (India.)

## मुंबईच्या बाजारांतील घडामोडी

### पैशाची विपुलता

मुंबईच्या बाजारांतील पैशाची विपुलता कायम आहे. अल्प मुदतीच्या ठेवींवरील व्याजाचे दर त्याचें निदर्शक होतें. युद्धकर्जे घेणारांस कांहीं बँकांनीं विशेष सवलती दिल्या आहेत. रिझर्व्ह बँकेकडील शेड्यूल्ड बँकांच्या ठेवींत बरीच भर पडली आहे. ट्रेझरी बिलांवरील व्याजाच्या दरांत कांहीं आठवडे घट पडत आहे. गेल्या आठवड्यांत हा दर १० आ. ७ पै पडला, त्या पूर्वीच्या आठवड्यांत तो ११ आ. ४ पै होता.

### सरकारी रोखे

सरकारी रोख्यांच्या किंमती टिकून राहिल्या. मध्यम मुदतीच्या रोख्यांस चांगली मागणी होती.

### सोनें-चांदी

सोन्याची उलाढाल बरेच दिवस झाली नव्हती, ती गेल्या आठवड्यांत झाली. त्याचे मागील आठवड्यांत सोन्याचा भाव ४१ रु. १२ आ. च्या आसपास होता. गेल्या आठवड्यांत सोन्याचा दर तोळ्यास किमान ४१ रु. ११ आ. ९ पै व कमाल दर ४३ रु. ३ आ. असा होता. सोन्याच्या भावांतील चढउताराचा परिणाम चांदीवरहि झाला व चांदीचा भाव ६४ रु. ३ आ. पर्यंत चढला.

### शेअर्स

शेअरबाजारांत विशेष असें कांहीं घडलें नाहीं व खरेदी-विक्रीहि फार मोठ्या प्रमाणावर झाली नाहीं.

---

### वॉर रिस्क्स ( गुड्स ) इन्शुअरन्स फंड

२६ ऑगस्ट रोजीं वॉर रिस्क्स ( गुड्स ) इन्शुअरन्स ऑर्डिनन्स काढण्यांत आला, त्यांत वॉर रिस्क्स इन्शुअरन्स फंडाची योजना स्पष्ट करण्यांत आली आहे. सक्तीच्या विम्याचे योजनेप्रमाणें जमा होणाऱ्या हप्त्यांची रकम त्या फंडांत टाकण्यांत येईल. सरकारास विमा पत्रकांतील कराराप्रमाणें क्लेम द्यावे लागतील, त्यांची तरतूद ह्या फंडांतून केली जाईल. व्यवस्थेचा खर्चहि त्यांतूनच भागविण्यांत येईल. फंड कमी पडल्यास सरकार आपल्या मामुली उत्पन्नांतून त्यांत भर घालील; उलट सरकारच्या मतें फंडांत जरूरीपेक्षा अधिक रकम असेल, तर ती रकम सरकारकडे उत्पन्न म्हणून जमा केली जाईल. युद्धविषयक धोक्याची व्याख्याहि ऑर्डिनन्समध्यें देण्यांत आली आहे. ह्या विमा-योजनेनुसार दिलेल्या पॉलिसींची कमाल मुदत तीन महिने राहील. शेतांतील उभीं पिकें, झाडें, गुरेंढोरें, कोळसा, खाणींतून काढलेलें अशुद्ध लोखंड, मॅंगेनीज, लोखंड व पोलाद, सोनें, चांदी वगैरे मौल्यवान धातु, तैलचित्रें, साध्या रंगांचीं चित्रें, पोस्टाचीं तिकिटें, १०० वर्षें ज्यांस झालीं नाहींत अशीं कलाकौशल्याचीं कामें, वगैरेंचा विमा वरील नियोजित विमा योजनेप्रमाणें उतरला जाणार नाहीं.

---

### सांगली संस्थान शिक्षक सहकारी पतपेढी लि. सांगली.

या पतपेढीची सातवी वार्षिक साधारण सभा रविवार तारीख १-९-४० इ. रोजीं दुपारीं ३-३० वाजतां सांगली मराठी शाळा नं. १ मध्यें श्री. व्ही. के. खाडिलकर चीफ रेव्हिन्यू ऑफिसर, सांगली संस्थान, यांचे अध्यक्षतेखालीं भरली होती.

मुंबई इलाख्यांतील सहकारी चळवळीच्या केंद्रस्थानीं

असलेली

# शेतकऱ्यांची प्रांतिक बँक

म्हणजेच

## बॉम्बे प्रॉव्हिन्शियल् को-ऑपरेटिव् बँक, लिमिटेड.

( सहकारी कायद्यान्वयें नोंदलेली )

स्थापना १९११.

मुख्य कचेरी-सर विठ्ठलदास ठाकरसी मेमोरिअल बिल्डिंग
९, बेक हाउस लेन, कोट मुंबई.

### शाखा

| | |
|---|---|
| १ बारामती ( जि. पुणें ) | १६ अकलूज ( जि. सोलापूर ) |
| २ सातारा ( „ सातारा ) | १७ विरमगांव ( „ अहमदाबाद ) |
| ३ इस्लामपूर ( „ „ ) | १८ धुळें ( „ प. खानदेश ) |
| ४ कऱ्हाड ( „ „ ) | १९ दोंडाईचें ( „ „ ) |
| ५ तासगांव ( „ „ ) | २० शिरपूर ( „ „ ) |
| ६ किर्लोस्करवाडी ( „ „ ) | २१ शहादें ( „ „ ) |
| ७ शिराळें ( „ „ ) | २२ नंदुरबार ( „ „ ) |
| ८ कोरेगांव ( „ „ ) | २३ साक्री ( „ „ ) |
| ९ वाई ( „ „ ) | २४ शिंदखेडें ( „ „ ) |
| १० अहमदनगर ( „ अहमदनगर ) | २५ तळोदें ( „ „ ) |
| ११ शेवगांव ( „ „ ) | २६ मालेगांव ( „ नाशिक ) |
| १२ कोपरगांव ( „ „ ) | २७ सटाणा ( „ „ ) |
| १३ भिवंडी ( „ ठाणें ) | २८ कळवण ( „ „ ) |
| १४ पालघर ( „ „ ) | २९ दोहद ( „ पंचमहाल ) |
| १५ कल्याण ( „ „ ) | ३० कालोला ( „ „ ) |

## खेळतें भांडवल रु. २००००००चे वर

या बँकेंत मुदतीच्या, चालू व सेव्हिंग बँक ठेवी स्वीकारल्या जातात

आणि

इलाख्यांतील बहुतेक सर्व प्रमुख ठिकाणीं हुंडीचा व्यवहार केला जातो.

या बँकेंत येणारा पैसा, शेतकरी व इतर अल्प उत्पन्नाचे लोक, यांच्या प्रत्यक्षपणें उपयोगी पडतो.

पूर्ण माहितीकरितां हेडऑफिस अगर शाखा-कचेऱ्यांस लिहा.

व्ही. एल्. मेहता,
मॅनेजिंग डायरेक्टर.

## विमा चीफ एजंटांचें सरकारास पत्रक

( ऑल इंडिया लाइफ चीफ एजंटस असोसिएशनच्या सेक्रेटरीनें सरकारकडे पाठविलेलें पत्रक )

विमा कंपन्यांनीं ठिकठिकाणीं आपल्या शाखा काढण्यापेक्षा चीफ एजंट्मार्फत काम मिळविणें कमी खर्चाचें व सोइस्कर आहे. चीफ एजंट्स् जितकें कसून काम करतात, तितकें शाखांचे व्यवस्थापक करणें शक्य नाहीं. ज्या कंपन्या चीफ् एजन्सीज्चे मार्फत काम मिळवितात, त्यांच्या खर्चाचें प्रमाण शाखांमार्फत व्यवहार करणाऱ्या कंपन्यांच्या खर्चाचें प्रमाणापेक्षां अल्प असतें, हें दाखविण्यासाठीं असोसिएशननें तयार् केलेला एक तक्ता येथें देण्यांत आला आहे:—

खर्चाचें प्रमाण

| कंपनीचें नांव | शाखा, चीफ किंवा दोन्ही | नवीन काम (लक्ष रु.) | खर्चाचें हप्त्यांच्या उत्पन्नाशी प्रमाण | |
|---|---|---|---|---|
| | | | १ लें वर्ष | रिन्युअल |
| १. ओरिएंटल | दो. | ९७२ | ९८·९६ | ९·९० |
| २. हिंदुस्थान | शा. | ३०४ | ११४·८१ | ११·४८ |
| ३. भारत | शा. | २२५ | १२७·६१ | १२·७६ |
| ४. बॉंबे म्यूच्युअल | ची. | २०१ | १०९·२४ | १०·९२ |
| ५. नॅशनल | शा. | १७८ | १३१·५८ | १३·१६ |
| ६. न्यू इंडिया | दो. | १५६ | १०५·१७ | १०·५२ |
| ७. युनायटेड इंडिया | शा. | १५२ | ११५·८२ | ११·५८ |
| ८. बॉंबे लाइफ | दो. | १३९ | १२१·६५ | १२·१६ |
| ९. एंपायर | दो. | १३७ | ११४·७२ | ११·४७ |
| १०. लक्ष्मी | शा. | ९५ | १२५·४४ | १२·५४ |
| ११. इंडस्ट्रियल अँड प्रूडेन्शिअल | दो. | ९५ | १०६·५९ | १०·६६ |
| १२. वेस्टर्न इंडिया | दो. | ८५ | ९८·३७ | ९·८४ |
| १३. एशियन | दो. | ७५ | | ११·७८ |
| १४. नॅशनल इंडियन | शा. | ४५ | १२९·०२ | १२·९० |
| १५. कॉमनवेल्थ | दो. | ४५ | १२५·९६ | १३·६० |
| १६. ट्रॉपिकल | दो. | ३९ | १०४·९४ | १०·४९ |
| १७. वॉर्डन | शा. | ३८ | १४४·८९ | १४·४९ |
| १८. ईस्ट अँड वेस्ट | दो. | ३४ | १४७·०९ | १४·७१ |
| १९. झेनिथ | शा. | ३२ | १७६·५३ | १७·६५ |

### "महाराष्ट्र परिचय"

श्री. माधव श्रीहरी ऊर्फ बापूजी अणे ह्यांच्या ६१ व्या वाढ दिवसानिमित्त "महाराष्ट्र परिचया"नें विशेष अंक प्रसिद्ध केला आहे. त्यामध्यें लोकनायक अणे ह्यांच्या विविध कामगिरींचा व त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची माहिती देणारे लेख एकत्र छापले आहेत. त्यांवरून त्यांच्या कार्याच्या व्यापकपणाची व त्यांच्या गुणवैशिष्ट्याची कल्पना येतें. ह्या अंकाचा प्रकाशनसमारंभ ता. १ सप्टेंबर रोजीं श्री. अ. स. करंदीकर ह्यांचे हस्तें झाला.

### आफ्रिकन वसाहतीचा दोस्त राष्ट्रांस पाठिंबा

आफ्रिकेंतील फ्रेंच वसाहत, चाद् ही दोस्त राष्ट्रांसच सहाय करणार आहे. ही वसाहत विषुववृत्तावर असून तिचें क्षेत्रफळ ४ लक्ष चौरस मैल आहे.

## मुंबई प्रांतांतील न्यायदान

मुंबई हायकोर्टांत १९३९ सालीं ओरिजिनल बाजूस ३,७१८ दावे दाखल झाले. २,२५३ दाव्यांचा निवाडा होऊन वर्षअखेर १,४६५ दाव्यांची चौकशी चालू राहिली. नादारीच्या १,८३८ अर्जांपैकी ६१५ अर्जांचा निकाल लागून १,२२३ अर्ज वर्षअखेर शिल्लक राहिले. ओरिजिनल बाजूच्या निवाड्यांवरील २६ अपिलें होतीं त्यांतील १४ अपिलांचा निकाल लागला. हायकोर्टानें त्याच्या अधिकारांतील दिवाणी कोर्टांच्या निवाड्यावरील ४,६०१ अपिलांचा निकाल लावला; ५,४०७ अपिलें वर्षअखेर शिल्लक होतीं.

मुंबई हायकोर्टाच्या न्यायदानाच्या अधिकारक्षेत्रांतील दिवाणी कोर्टांत एकूण १,२९,३७० दावे लावले गेले. त्यांपैकी १,०३,७६२ दावे पैशांच्या वसुलीबाबत होते. सर्व दाव्यांची किंमत ४ कोटि, ४४⅓ लक्ष रुपये होती. एकूण २,००,०४२ दावे निवाड्यासाठी होते, त्यांपैकीं १,३३,२७८ दाव्यांचा निवाडा झाला. सबजज्जांनीं १,०८,६०४, स्मॉल कॉजिस कोर्टांनीं १२,६५१, डिस्ट्रिक्ट कोर्टांनीं ५८२ व खेडेगांवच्या मुन्सफ कोर्टांनीं ११,४०१ दाव्यांचा निवाडा केला. इनामदारांनीं व जहागिरदारांनीं मिळून ४० दावे निकालांत काढले. वर्षअखेर ६६,७२५ दाव्यांचीं कामें चालू होतीं.

### हुकूमनामे

हुकूमनामे बजावण्यासाठी २,८६,९८८ अर्जांचें काम वर्षारंभीं चालू होतें, त्यांपैकीं १,६८,६६५ अर्जांचा निकाल देण्यांत आला. वर्षअखेर, १,१८,२७३ अर्ज शिल्लक आहेत. स्मॉल कॉझेस कोर्टेंखेरीज बाकी कोर्टांत एकूण ७६,२६,५०१ रुपये वसूल झाले.

मुंबईच्या स्मॉल कॉझ कोर्टांत अहवालाचे वर्षीं २५,६४१ दावे लावण्यांत आले व २६,१७६ दाव्यांचें काम पुरें झालें. हायकोर्टांत एकूण १९ लक्ष, २१ हजार रुपये जमा झाले व खर्च १४ लक्ष, ४१ हजार रुपये झाला.

अहवालाचे वर्षीं एकूण ३,३०,८२३ गुन्ह्यांची खबर देण्यांत आली त्यांपैकीं ३,१९,१८४ खरे ठरले.

### युद्धवार्तेचा प्रसार

मुंबईच्या युद्ध प्रचार समितीनें मुंबईंत कांहीं ठिकाणीं लाउड स्पीकर लावले आहेत. त्यांतून लोकांस गाणीं, युद्धवार्ता, माहितीपूर्ण भाषणें वगैरे ऐकावयास मिळतील.

### युद्धविषयक मागणी

चालू युद्धास प्रारंभ झाल्यापासून जून, १९४० अखेर, युद्धविषयक मागणीपैकीं हिंदुस्थानानें दोस्त राष्ट्रांस २ कोटि, ९० लक्ष सिगारेट्स व २,९४० पौंड तंबाखू ह्यांचा पुरवठा केला आहे. त्याचप्रमाणें २२ हजार टन गव्हाचे पदार्थ, ३१२ टन चहा, ९ हजार टन तांदूळ, २½ हजार टन डाळ, ३९ हजार टन इतर धान्यें, वगैरेंचीहि निर्गत झालेली आहे.

### मंत्र्यांची कार्यतत्परता

ब्रिटिश मंत्रिमंडळाचे सभासद आपला सर्व वेळ अविश्रांत आपल्या कामाकडे देत असून रात्रीहि ते आपल्या कचेऱ्यांतच निजत आहेत. मुख्य प्रधान, मि. चर्चिल, ह्यांवर कामाचा अतिशय ताण पडत असला तरी त्यांची खेळीमेळीची वृत्ति कायम आहे.

## निवडक बाजारभाव

बँक रेट ( २८ नोव्हेंबर, १९३५ पासून ) ३%

### सरकारी आणि निमसरकारी रोखे

| | |
|---|---|
| ३% कन्माफ लोन ( १९४५-५५ ) | ९११—६ |
| ४% १९४३ | १०४—४ |
| ३½% बिनमुदत | ९०—४ |
| ३½% १९४७-५० | १०१—५ |
| ३% ( १९६३-६५ ) | ९०—३ |
| २½% १९४८-५२ | ९५-१० |
| ४% पोर्ट ट्रस्ट ( लांब मुदत ) | १०२—३ |
| ४% मुंबई म्युनिसिपल ( लांब मुदत ) | १०१—८ |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५१-६१ ) | १०७—० |
| ५% म्हैसूर कर्ज ( १९५५ ) | ११८—० |

### मंडळ्यांचे भाग

( कंसातील पहिला आकडा भागाची दर्शनी किंमत, दुसरा आकडा वसूल झालेलें भांडवल व कंसानंतरचा आकडा वार्षिक डिव्हिडंड दर्शवितो.)

#### बँका

| | |
|---|---|
| बँक ऑफ इंडिया ( १००-५० ) ११% | १३४—८ |
| बँक ऑफ बरोडा ( १००—५० ) १०% | १०१—४ |
| सेंट्रल बँक ऑफ इंडिया ( ५०—२५ ) ८% | ३६—० |
| इंपिरिअल बँक ( ५०० ) १२% | १४८१—४ |
| बाँबे मॉ. को. बँक ( ५० ) ४% | ५३—० |
| रिझर्व्ह बँक ( १०० ) ३½% | १०० —८ |

#### वीज

| | |
|---|---|
| बाँबे ट्रॅम्वे ऑर्डि. ( ५० ) ११% | १२५—४ |
| कराची ( १०० ) ९% | १९७—८ |
| पुणें इलेक्ट्रिक ( १०० ) ९% | १८२—८ |
| टाटा पॉवर ऑर्डि. ( १००० ) ५½% | १३३०—० |
| आंध्र व्हॅली ऑर्डि. ( १००० ) ७½% | १५२२—८ |

#### रेल्वेज

| | |
|---|---|
| दौंड-बारामती ( १०० ) ४½% | ९३—० |
| पाचोरा-जामनेर ( १०० ) १½% | ६४—० |
| अहमदाबाद प्रांतज (५००) ११½% | १०२२—८ |
| तापी व्हॅली ( ५०० ) ८% | ७६२-१२ |

#### इतर

| | |
|---|---|
| बेलापूर शुगर ( ५० ) ७ रु. | २००—० |
| इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट ( १००-५० ) २ रु. | ४६—४ |
| सिंधिया स्टीम ( १५ ) १ रु. | १८-१४ |
| न्यू इंडिया विमा ( ७५-१५ ) १ रु. | ३७—१० |
| ओरिएंटल विमा ( २०० ) १२५ रु. | ३५७५—० |
| टाटा आयर्न प. प्रे. ( १५० ) ६% | २०१-१२ |
| टाटा आयर्न दु. प्रे. ( १०० ) १८ रु. १० आ. | १४०—४ |
| टाटा आयर्न ऑर्डि. ( ७५ ) १५ रु. | ३१६—८ |
| टाटा आयर्न डिफर्ड ( ३० ) ७५ रु. ११ आ. ३ पै. | १६४२—८ |
| असोसिएटेड सिमेंट ( १०० ) ५ रु. | ११२-१२ |

#### सोनें-चांदी

| | |
|---|---|
| सोनें ( मिंट ) प्रत्येक तोळ्यास | ४२-२-० |
| चांदी प्रत्येक १०० तोळ्यांस | ६३—७-६ |

स्पृहणीय यश
कॉमनवेल्थचे दरांत २० टक्के वाढ
तारीख ३० एप्रिल १९३८ रोजीं झालेल्या मूल्यमापनाचा निकाल.

| हयातीनंतरचे विम्यावर | त्रैवार्षिक-दर हजारीं | हयातींतील विम्यावर |
|---|---|---|
| रु. ५४ | बोनस | रु. ४५ |

आजच "कॉमनवेल्थ" ची पॉलिसी घेऊन कंपनीचे उत्कर्षांत भागीदार व्हा.
दि कॉमनवेल्थ ॲशुअरन्स कंपनी लि० पुणें
लिहा अगर समक्ष भेटा.
श्री. रा. न. अभ्यंकर, बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग एजंट.
सर्वत्र कार्यक्षम व विश्वासू एजन्ट आकर्षक अटींवर नेमणें आहेत.

मधुमेहावरील औषध
तीन आठवड्यांचे औषधास फक्त रु. ७
— मागविण्याचा पत्ता —
मॅनेजिंग डायरेक्टर, रुरल प्रॉडक्टस कंपनी लिमिटेड
९२३ ए, सदाशिव, पुणें २.

दहा हजार रुपयांचीं घड्याळें बक्षिस
"जौहरे हुस्न" ह्या आमच्या प्रसिद्ध रजिस्टर्ड औषधांच्या वापरण्यानें शरीराच्या कोणत्याहि भागावरील केस कांहींहि त्रास न होतां नाहींसे होतात आणि जन्मभर पुन्हां कधींहि त्या ठिकाणीं ते येत नाहींत. औषध लावलेली जागा रेशमासारखी मऊ, नरम व सुंदर होऊन जाते. बाटलीची किंमत फक्त १ रु. १४ आणे. ह्या औषधाच्या प्रसिद्धी खातर प्रत्येक बाटलीबरोबर एक फॅन्सी रिस्ट वॉच फुकट पाठवण्यांत येतें. हें घड्याळ अत्यंत सुंदर व मजबुत आहे. सौंदर्य व मजबुती ह्या विषयींची दहा वर्षांची गॅरंटी देण्यांत येते आणि गॅरंटीचा करारनामा प्रत्येक घड्याळाबरोबर पाठवण्यांत येतो.
सूचना—माल पसंत न पडल्यास त्याची किंमत परत केली जाते. तीन बाटल्या एकदम घेणारांस टपाल हंशील माफ आहे आणि तीन घड्याळें बक्षिस मिळतात.
पत्ताः—लंडन कमर्शिअल कंपनी
पोस्ट बॉक्स नं. २७ (A. P.) अमृतसर-Amritsar.




एजंट:—
महादेव गोविंद कुलकर्णी
किराणा व भुसार मालाचे व्यापारी
७८६ सदाशिव, पुणें शहर.

सरकारी डिप्लोमा मिळाल्यानंतर पुढील प्रॅक्टिस व धंदेशिक्षण घेऊन
जर्नीमन टेलर व्हा.
मुदत सहा ६ महिने, फीसह सर्व खर्च ६० रु., अगदीं नवीन विद्यार्थ्यास
फीसह सर्व ११० रु. मुदत १ वर्ष
पराडकर टेलर्स ॲकेडिमी, ६७२ सदाशिव, पुणें.

PARADKAR TAILORING ACADEMY POONA

'अर्थ' ग्रन्थमाला

# बँका आणि त्यांचे व्यवहार

लेखकः—प्रो. वा. गो. काळे व श्री. श्री. वा. काळे

**दुसरी आवृत्ति तयार झाली.**

या पुस्तकांत बँकांची घटना, व्यवहार व कामकाजाची पद्धति यांचें सोपपत्तिक विवेचन अत्यंत सोप्या भाषेंत केलेलें असून बँकांनीं आपला व्यवहार सुरक्षितपणें व फायदेशीर रीतीनें कसा करावा या बाबतींत अनेक महत्त्वाच्या व उपयुक्त सूचना केल्या आहेत. चलन, हुंडणावळ, आधुनिक तऱ्हेच्या बँका, मध्यवर्ती बँका, सहकारी बँका, सावकारी धंदा, ठेवी, डिस्कौंट व कर्जें इत्यादि महत्त्वाच्या प्रचलित व व्यावहारिक विषयांची सांगोपांग चर्चा त्यांत आली आहे. सध्याच्या परिस्थितींत प्रत्येक महाराष्ट्रीय नागरिकास वरील प्रश्नांची माहिती अत्यावश्यक असल्यानें मुद्दाम त्यांचें बोधप्रद विवेचन या पुस्तकांत केलें आहे. विषयाची मांडणी व विवेचनपद्धति सुलभ असल्यामुळें सदर पुस्तक सर्वसाधारण वाचकांसहि उपयुक्त होणार आहे. किंबहुना, त्यांचेकरितांच तें सहेतुक लिहिलें आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं. सबब, बँकांचे भागीदार, ठेवीदार, डायरेक्टर, गिऱ्हाइक, व्यवस्थापक आणि नोकर यांनीं विशेषतः हें पुस्तक अवश्य वाचावें.

दुसऱ्या आवृत्तींत आवश्यक त्या नवीन माहितीची भर घालणारीं अनेक प्रकरणें समाविष्ट केलीं असून रिझर्व्ह बँकेनें सुचविलेल्या कायद्याच्या मसुद्याचें विवेचनहि त्यांत आलेलें आहे.

किंमत १ रु. ८ आ. टपालखर्च वेगळा.

पुस्तकें मागविण्याचा पत्ता:—(१) व्यवस्थापक, अर्थ ग्रन्थमाला, पुणें ४.
(२) को-ऑपरेटिव्ह बुक डेपो, ९ बेक हाउस लेन, फोर्ट, मुंबई.

हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे, यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास,' भांबुर्डा, घ. नं. १२४।१३, पुणें शहर, येथें प्रसिद्ध केलें.